महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. :- ८०६९
दिनांक :- १५/३/२०२१.

---

विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड १९) आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र (micro containment Zone) सुक्ष्म प्रतिबंधीत क्षेत्र घोषित करणेबाबत

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०२०

२) महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०

३) केंद्रिय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४) सार्वजनीक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना-२०२०/५८ आरोग्य दि.१३.०३.२०२०

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून (कोव्हीड १९) च्या रुग्ण वाढीचा दर वाढलेला असून त्यामुळे कोरोना विषाणूची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षत्रातील खालील ठिकाणी (कोव्हीड १९) विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने रुग्ण आढळून येत आहेत.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव |
|---|---|---|---|
| १ | बिबवेवाडी कार्यालय | २८ | सुजय गार्डन |
| २ | बिबवेवाडी कार्यालय | २८ | मिरा सोसायटी |
| ३ | बिबवेवाडी कार्यालय | ३६ | कुमार पार्क |
| ४ | बिबवेवाडी कार्यालय | ३६ | वर्धमानपुरा सोसायटी |
| ५ | बिबवेवाडी कार्यालय | ३७ | महेश सोसायटी |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी सदरचा परीसर हा (Micro Containment Zone) सुक्ष्म प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

वरील परीसर व त्याच्या आजूबाजूच्या परीसरात राहणा-या नागरीकांनी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

सोसायटी/घर/बंगला तसेच चाळ इ. ठिकाणी राहणा-या नागरीकांनी त्यांच्या आवारात अथवा घरी भेट देणा-या प्रत्येक व्यक्तिचे पल्स ऑक्सिमिटर आणि थर्मल डिटेकटरच्या सहाय्याने तपासणी केली जावी.

कोव्हीडसाठी पल्स ऑक्सिमिटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तिची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरीत पुढील तपासणी करून घेणेबाबतची सूचना देण्यात यावी.

सोसायटी/घर/बंगला या ठिकाणी राहणा-या जेष्ठ व्यक्ती/१० वर्षाखालील मुले/आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ति यांची पल्स ऑक्सिमीटरद्वारे तपासणी करून त्यांची दैनंदिन नोंद ठेवण्यात यावी.

या अनुषंगाने ज्या व्यक्तिंची ०-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ किंवा त्या खाली असल्यास अशा व्यक्तिंची डॉक्टरांच्या सल्ल्याने तात्काळ स्वॅब टेस्ट करून घेण्यात यावी. स्वॅब टेस्ट करणेकरीता बिबवेवाडी कार्यालयामार्फत अग्निशमन केंद्र, गंगाधाम चौक, बिबवेवाडी पुणे ३७ या ठिकाणी मोफत सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत आपले परीसरातील आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

आपले सोसायटी/चाळ इ. ठिकाणी कोव्हीड १९ व्यतिरीक्त इतर आजारांकरीता रूग्नालयात दाखल असणा-या रूग्नांबाबतची माहिती कृपया bibwewadipunecorporation.org या ईमेल आयडी वर उपलब्ध करून द्यावी जेणेकरून केवळ कोव्हीड १९ चे अनुषंगाने माहितीचे विश्लेषण करून वैद्यकीय विभागामार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

सोसायटीचे आवारात सोशल डिस्टन्सिंग चे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर करेल याबाबतची दक्षता घ्यावी.

वरील सूचनांचे पालन करून आपण आपली आपल्या कुटुंबाची तसेच आपल्या परीसराचा कोव्हीड १९ पासून बचाव करू शकता.

पुणे शहर कोरोना विषाणू मुक्त करणेकरीता आत्तापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याबद्दल बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचे वतीने मी आपला ऋणी असून अद्यापही कोरोनाचे संकट पूर्णतः न टळल्याने आपण सहकार्य करावे ही विनंती.

(गणेश सोनुने)
महापालिका सहाय्यक आयुक्त
तथा सनियंत्रण अधिकारी
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यावाहीसाठीः-

१)मा. सहाय्यक आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका
२)मा. उप आयुक्त परीमंडळ विभाग क्र.५, पुणे महानगरपालिका
३)मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, बिबवेवाडी पोलिस स्टेशन, पुणे
४)मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, स्वारगेट पोलिस स्टेशन, पुणे